
*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege. org, 9226563052*

---

## युनिट 6 : प्रो. राजेंद्र प्रसाद

### Rajendra Prasad

(19 January 1926)



One of the distinguished creative philosophers of contemporary India, formerly senior professor of philosophy and head of the department of humanities and social sciences of Indian Institute of Technology. educated at Patna University and University of Michigan.

He has been a Fulbright/Smit-Mundt Fellow, a Rockefeller Foundation Fellow, thrice a National Lecturer of the UGC, a National Lecturer and Senior Fellow of the ICPR and, until recently, a National Fellow of the latter. Professor Prasad has been General President of Indian Philosophical Association, Akhil Bharatiya Darsan Parishad, and Indian Philosophical Congress.



## भारतीय तत्त्वज्ञानातील मोक्षाची संकल्पना

### 1. प्रो. राजेंद्र प्रसाद यांच्या मते पुरुषार्थ सिध्दांतातील अर्थ पुरुषार्थाचे स्थान काय आहे ? (50 शब्द 5गुण)

पुरुषार्थ या संज्ञेचे दोन अर्थ प्रो. राजेंद्र प्रसाद सांगतात. एक, व्यक्तिला जे मिळवावायचे ते आणि दुसरा इष्ट म्हणजे वांछित. वांछित म्हणजे ज्याची इच्छा केलीच पाहिजे ते. पण वांछित व वाछंनीय यात तार्किक फरक असून त्यापेक्षा साध्य व साधन असा फरक करणे, जास्त योग्य ठरेल, असे त्यांचे मत आहे.अर्थ या पुरुषांर्थास साधन मूल्य आहे.प्रत्यक्षातील वांच्छित गोष्टी आणि वांछनीय गोष्टी यात प्राचीन भारतीयांनी गोधळ केला आहे.अर्थ पुरषार्थाची माणसाने इच्छा- वांछा केलीच पाहिजे, असे नाही. उलट ती न करणाऱ्याची लोक पूजा करतात. पण प्रत्यक्षात मात्र लोकांना पैशाचीच इच्छा असते. म्हणून अर्थाला साधन मानावे, असे राजेंद्र प्रसाद म्हणतात. त्यांच्या मते, अर्थ पुरुषार्थ वास्तवात साध्य व साधन अशा दोन्ही अर्थाने वांछिला जातो.

### 2. प्रो. राजेंदप्रसाद यांची धर्म संकल्पना (100 शब्द 5 गुण)

पुरुषार्थ सिध्दांतावर टीका करताना प्रो. राजेंद्र प्रसाद यांनी प्राचीन भारतीयांना प्रत्यक्षातील वांच्छित गोष्टी आणि वांछनीय गोष्ट यात गोधळ केला आहे, असे दाखवून दिले आहे.त्यांच्या मते, अर्थ व काम यांच्यात साध्य-साधन संबंध आहे. आणि काम व धर्म यांच्यात मात्र समर्थ्य-समर्थक संबंध आहे. समर्थ्य म्हणजे ज्याचे मिळविणे योग्य आहे, समर्थनीय आहे असे होय. कामसाधना धर्ममार्गाने करावी, ती समर्थनीय आहे, असा त्याचा पारंपरिक अर्थ होतो. पण धर्म पुरुषार्थाला साध्य मानण्यापेक्षा समर्थक मानणेच, योग्य आहे. म्हणूनच धर्म हा पुरुषार्थ साधन नाही. असे राजेद्र प्रसाद म्हणतात.

तसेच धर्म हा शब्द इंग्लीशमधील रिलीजन या अर्थाने वापरला जातो. पण प्राचीन भारतीयांनी धर्म व नीती यात फरक न करता दोन्ही समान मानले. पण वस्तुत: धर्म व नीती ही क्षेत्रेच वेगवेगळी आहेत.कारण दोन्ही क्षेत्रातील संघर्षच

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege. org, 9226563052*

---

भिन्न असतात.पण भारतीयांनी ही गोष्ट गांभीर्यानी घेतली नाही, ही खंत आहे.खरे तर धम व नीती यातील संबंध खूपच गुंतागुंतीचा आहे.

**3. भारतीय तत्त्वज्ञानातील मोक्ष संकल्पनेबाबत प्रो. राजेंद्रप्रसाद यांनी व्यक्त केलेल्या दृष्टिकोनाची चिकित्सा करा. (200 शब्द 10गुण)**

**4. भारतीय तत्त्वज्ञानातील मोक्ष संकल्पनेबाबत प्रो. राजेंद्रप्रसाद यांचा दृष्टिकोन कोणता आहे ? चिकित्सा करा. (500 शब्द 20गुण)**



पुरुषार्थ सिध्दांतावर टीका करताना प्रो. राजेंद्र प्रसाद यांनी प्राचीन भारतीयांना प्रत्यक्षातील वांच्छित गोष्टी आणि वांछनीय गोष्ट यात गोधळ केला आहे, असे दाखवून दिले आहे.त्यांच्या मते, धर्म,अर्थ, काम आणि मोक्ष ही पुरुषार्थ मांडणी परंपरेने स्वीकारली खरी, पण साध्य-साधनवाद यांच्यात गल्लत केली गेली. या सगळ्याना जीवनाचे ध्येय मानले गेले.

पण वस्तुत: धर्म व काम यांच्यातच केवळ साध्य-साधन संबंध आहे. आणि काम व धर्म यांच्यात मात्र समर्थ्य-समर्थक संबंध आहे.म्हणजे धर्ममान्य कामसेवनच योग्य मानले गेले.त्यांच्या मते, मूल्याचे वर्गीकरण म्हणून पुरुषार्थ सिध्दांताचे वर्गीकरण व्यवस्थित नाही. त्यातील मोक्षाची भर ही तर कमालीची गोंधळाची बाब आहे, हे राजेद्रप्रसाद दाखवून देतात.

भारतीयांनी मोक्षाला अंतिम साध्य परुषार्थ मानले व त्या साध्याचे साधन म्हणून इतर तीन पुरुषार्थ मानावे, असेही मानले.मोक्षाच्या स्वरूपाविषयी अनेक सिध्दांत मांडले गेले, पण ती सारी मोक्षाचे वर्णन करणारी व आदर्श मानणारी आहेत. त्यातून मोक्षाचे तार्किक स्वरूप व्यक्त होत नाही.मुळात "मोक्ष हे जीवनाचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे", ही राजेद्रप्रसाय यांच्या मते प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील हट्टाग्रह किंवा असे गृहीतक मानले गेले की ज्याबद्दल प्रश्नच उपस्थित केले जाऊ नयेत ! पण हा दृष्टिकोन चुकीचा व वैचारिक प्रगतीला मारक आहे.

मोक्षाचे तार्किक स्वरूप काय? हाच प्रश्न खरे तर विचारला गेला पाहिजे.मोक्षाला अंतिम सत्ता मानले गेले आहेच पण अंतिम नैतिक मूल्यही मानले गेले आहे, हे समीकरण तर धांदात दिशाभूल करणारे आहे.कारण अंतिम सत्ता व अंतिम मूल्य या दोन वेगळया गोष्टी आहेत.अंतिम सत्ता अंतिम मूल्य मानणे, हा दुराग्रह आहे.

मुख्यत: नीतीचे साध्य रूप म्हणून मोक्ष स्वीकारणे, चुक आहे. मोक्षाला जास्त महत्व देवून नीती कमी महत्वाची, दुय्यम मानली गेली.पण हे चुकीचे आहे. कारण जो मोक्षमार्गी नाही, मोक्ष मानीत नाही, तो माणूसही नीती मानतो.जसे चार्वाक मोक्ष स्वीकारीत नाहीत, पण नीती स्वीकारतात. मग नीती महत्वाची की मोक्ष महत्वाचा ? उघडच नीती महत्वाची आहे. पण भारतीयांनी मात्र नीती व मोक्ष यांच्यात समानत मानून नीती दुय्यम केली, धर्माचे व नीतीचे दार मोक्षासाठीच खुले ठेवले, धर्म व नीती यांचे समर्थन करण्याचा मार्ग मोक्षाचा स्वीकारला, त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान स्वतंत्ररित्या नीतिशास्त्र विकसति करू शकले नाहीत, हा राजेंद्रप्रसाद यांचा मुख्य आक्षेप आहे. शिवाय तार्किक कसोटीवर मोक्ष स्वीकारता येत नाहीच, ही तर अडचण कायमची आहेच.

---